# औ. प्र. संस्था, नाशिक मध्ये रक्तदान शिबीर उत्साहात संपन्न

जिल्हा शासकीय रुग्णालय नाशिक व राष्ट्रीय सेवा योजना, औ. प्र. संस्था नाशिक अंतर्गत औ. प्र. संस्था, सातपूर नाशिक येथे दि. १२/०४/२०२२ रोजी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन संस्थेचे प्राचार्य राजेश मानकर यांनी स्वतः रक्तदान करून केले. रमाकांत उनवणे , स. प्र. स., बी. टी. आर. आय. नाशिक, शांताराम राठोड, उपप्राचार्य, चेतन बुरकुल, उपप्राचार्य यांनी सुद्धा रक्तदान केले. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी आजच्या तरुण पिढीला राष्ट्रीय सेवा योजनेचे मुळे सामाजिक जाणीव, सामाजिक भान याचे ज्ञान मिळत असून अशा शिबिरात त्यांना समाजासाठी काही तरी काम करण्याची प्रेरणा घ्यावी व जास्तीत जास्त स्वयंसेवकांनी रक्त दान करण्याचे आवाहन संस्थेचे प्राचार्य राजेश मानकर यांनी केले.

या शिबिरात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवका सोबतच महिला स्वयंसेवकांनी पण मोठ्या संख्येने सहभाग घेतल्यामुळे या रक्तदान शिबिरात १२२ पिशव्या रक्त संकलन करण्यात आले. शिबिर यशस्वी करण्याकरिता जिल्हा रुग्णालयातील डॉ. अहिल्या धडस व राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रीरत्न बरडे, कार्यक्रम अधिकारी, जितेंद्र सांबरे, कार्यक्रम अधिकारी यांनी प्रयत्न केले तर उद्य अहिरराव यांनी आभार व्यक्त केले.







